# सुखशांती को.-ऑप हौसिंग सोसायटी लि.

रजि.नं. एनबीओएम./ सिडको / एचएसजी.(ओएच)/ ७५२ / जेटीआर /१९९८-९९

सेक्टर -९, बिल्डींग नं. डी-१ ते डी-१०, कोपरखैरणे, नवी मुंबई - ४०० ७०९.


संदर्भ क्र. - २८८/2024 दिनांक - 24/07/2024

## दिनांक ३०/०६/२०२४ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

सुखशांती को-ऑप हौसिंग सोसायटी लि. या संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ३०/०६/२०२४ रोजी दुपारी ठीक ०२:०० वाजता न्यु बॉम्बे झोरॅष्ट्रियन असोसिएशन चॅरिटेबल ट्रस्ट हॉल, पहिला मजला, प्लॉट नं.१४/२, सेक्टर-९, कालिकामाता मंदिरासमोर, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७०९. या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सभासद उपस्थित होते.

**उपस्थित सभासद संख्या – ५७**

प्रथम सोसायटीचे अध्यक्ष श्री. महादेव सर्जेराव शिंगाडे यांनी उपस्थित सर्व सभासदांचे स्वागत केले व त्यानंतर सोसायटीचे सभासद श्री. शशिकांत चौधरी यांना सभेचे सूत्रसंचालन करण्याची विनंती केली त्यावर श्री. शशिकांत चौधरी यांनी सूत्रसंचालनाची जबाबदारी स्विकारुन, या विशेष सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष म्हणून सोसायटीचे विद्यमान अध्यक्ष श्री. महादेव सर्जेराव शिंगाडे यांचे नाव सुचविले व त्यास श्री. भाऊसाहेब ठाणगे यांनी अनुमोदन दिले व त्यानंतर सर्वानुमते या विशेष सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष म्हणून श्री. महादेव सर्जेराव शिंगाडे यांची निवड करण्यात आली.

सोसायटीचे अध्यक्ष श्री. महादेव सर्जेराव शिंगाडे यांनी उपस्थित सर्व सभासदांस सांगितले कि, या विशेष सर्वसाधारण सभेस प्रथम सभासदांव्यतिरिक्त सहसभासद तसेच सभासदांचे इतर नातेवाईक देखील उपस्थित आहेत,याबाबत सभासदांनी योग्य तो निर्णय घ्यावा त्यावर सभासदांनी विचारविनिमय करून सर्वानुमते ठरविण्यात आले कि, सहसभासद तसेच सभासदांचे इतर नातेवाईक यांनी पाठीमागे बसावे तसेच सभेच्या कामकाजात हस्तक्षेप करू नये अशी विनंती देखील सोसायटीच्या सभासद श्रीमती. रचना म्हात्रे यांचेद्वारे करण्यात आली.

सोसायटीचे सभासद श्री. शशिकांत चौधरी यांनी सभेपुढे शोक प्रस्ताव मांडला. सोसायटीचे सभासद व माजी अध्यक्ष श्री. अशोक दिघे व श्री. हरिदास सरजिणे यांचे अल्पशा आजारामुळे निधन झाले, त्यांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहण्यात आली.

त्यानंतर सोसायटीचे सभासद श्री. सुनील खाडे यांनी सोसायटीच्या कमिटीने आतापर्यंत केलेल्या कामकाजाचा संक्षिप्त आढावा /प्रेजेंटेशन विशेष सर्वसाधारण सभेपुढे मांडले. त्यानंतर श्री. शशिकांत चौधरी यांनी या विशेष सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका सविस्तरपणे सभेपुढे मांडली व सोसायटीच्या संकेतस्थळाचे उदघाटन करण्यास अध्यक्षांना विनंती केली, त्यानंतर सोसायटीच्या संकेतस्थळाचे (**www.sukhshanti-chs.in**) उदघाटन सोसायटीचे अध्यक्ष श्री. महादेव सर्जेराव शिंगाडे यांचे हस्ते करण्यात आले. सोसायटीच्या संकेतस्थळाला उपस्थित सर्व सभासदांनी मान्यता दिली. सोसायटीचे अध्यक्ष श्री. महादेव सर्जेराव शिंगाडे यांनी सभेचे कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी सभासदांनी सहकार्य करावे अशी विनंती केली. व सभेचे पुढील कामकाज रीतसर सुरु करण्याबाबत श्री. शशिकांत चौधरी यांना विनंती केली. त्यानंतर रीतसर सभेच्या कामकाजास सुरवात करण्यात आली.

विशेष सर्वसाधारण सभेच्या दिनांक १४/०६/२०२४ रोजीच्या नोटिसीमध्ये दिल्यानुसार पुढीलप्रमाणे विषय चर्चेसाठी घेऊन ठराव संमत करण्यात आले.

**विषय क्र.१) दिनांक २९/१०/२०२३ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

<u>ठराव क्र.१</u> उपरोक्त विषय श्री.शशिकांत चौधरी यांनी सभेपुढे मांडला, व सोसायटीचे कमिटी सदस्य श्री. शिवराज पाटील यांना विनंती केली कि, दिनांक २९/१०/२०२३ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सभेपुढे वाचून दाखवावे. त्यावर श्री. शिवराज पाटील यांनी सदर इतिवृत्त सविस्तरपणे वाचून दाखविले. व सदर इतिवृत्त कायम करण्यासाठी सभासदांनी मंजुरी द्यावी असे सभेपुढे सांगितले. सदर विषयावर सभासदांशी सविस्तर चर्चा करण्यात आली व चर्चेनंतर सदर विषय क्रमांक १ मंजुरीकरिता सभासदांनी हात वर करून आपले मत नोंदवावे असे श्री. शशिकांत चौधरी यांनी सभेस आवाहन केले त्यावर सभेस उपस्थित एकूण ५७ सभासदांपैकी ५३ सभासदांनी हात वर करून ठरावाच्या बाजूने मत नोंदवून ठरावास मंजुरी दिली, तर ४ सभासदांनी ठरावाच्या विरोधात मत नोंदवून ठरावास विरोध दर्शविला. त्यानंतर दिनांक २९/१०/२०२३ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त ५३ विरुद्ध ४ अशा बहुमताने मंजूर करण्यात आले.

**" ठराव करण्यात येतो कि, दिनांक २९/१०/२०२३ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सविस्तरपणे वाचून ते बहुमताने कायम करण्यात येत आहे."**

**सूचक:-श्री.राजेश दिघे-सदनिका क्र. डि-१/३/२-१ अनुमोदक:-श्रीमती.रचना म्हात्रे सदनिका क्र.डि-७/३/२-२**

**ठराव बहुमताने मंजूर**

**विषय क्र.२) दिनांक २९/१०/२०२३ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेतील ठराव क्र. ०२ नुसार संचालक मंडळाने नियुक्त केलेल्या इमारतींच्या पुनर्विकास कामासाठी शासनाचे /स्थानिक प्राधिकरणाकडील पॅनलवरील तज्ञ व अनुभवी वास्तुविशारद /प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची निवड मान्य करून कायम करणे.**

<u>ठराव क्र.२</u> उपरोक्त विषय श्री. शशिकांत चौधरी यांनी सभेपुढे मांडला व सदर विषयावर चर्चा करून सभासदांनी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्या निवडीस मंजुरी द्यावी असे सभेपुढे सांगितले. त्यानंतर श्री. सुनिल खाडे यांनी सोसायटी कार्यालयास प्राप्त झालेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणुकीबाबतच्या निविदांबाबत विशेष सर्वसाधारण सभेपुढे सविस्तर माहिती दिली तसेच ज्या सभासदांना याबाबतीत अधिकची माहिती हवी असल्यास सोसायटी कार्यालयात उपलब्ध आहे असे देखील त्यांनी सभेपुढे सांगितले. त्यानंतर सोसायटीच्या कमिटीने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणुकीसाठी दिनांक २३ व २४ नोव्हेंबर २०२३ रोजी लोकसत्ता, वाशी टाईम्स, डेली न्यूज बँड या वर्तमानपत्रात जाहिरात दिली होती. त्यानुसार सोसायटी कार्यालयास ०५ निविदा प्राप्त झाल्या होत्या त्यामधील ०३ निविदांची चर्चेकरिता निवड करून त्यांच्याशी चर्चा करून त्यानंतर सर्वानुमते सोसायटीच्या कमिटीने मे.दिलीप संघवी कन्सल्टन्ट यांची सोसायटीचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून निवड केल्याचे देखील सभेपुढे सांगितले. तसेच मे. दिलीप संघवी कन्सल्टन्ट यांचीच निवड का केली त्याबाबत देखील श्री. सुनिल खाडे यांनी त्यांच्या आजपर्यंतच्या कामाबाबतची माहिती विशेष सर्वसाधारण सभेपुढे दिली.

त्यानंतर श्री. शशिकांत चौधरी यांनी सभासदांना विनंती केली कि, सोसायटीच्या कमिटीने केलेली प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची निवड मान्य करायची कि नाही तसेच सदर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार निवडीबाबत सभासदांनी आपली मते मांडावित. त्यावर सोसायटीचे सभासद श्री.सूर्यकांत वायदंडे यांनी आपले मत मांडले कि, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची निवड/नेमणूक करण्यापूर्वी त्यांची माहिती घ्यावी तसेच त्यांचे कामाबाबत चौकशी देखील करावी. तसेच कमिटीने निवड केलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे विरुद्ध सागर को-ऑप हौसिंग सोसायटी लि. संदर्भात कोर्टात केस दाखल आहे असे देखील सभेपुढे मांडले.

त्यावर श्री. सुनिल खाडे यांनी सांगितले कि, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक करण्याअगोदर सोसायटीच्या कमिटीने / सभासदांनी त्यांचेबाबत योग्य ती माहिती घेऊनच त्यांची नियुक्ती केलेली आहे. त्यानंतर सभासद श्री. शशिकांत चौधरी यांनी सभेस आवाहन केले, सोसायटीच्या कमिटीने केलेली प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची निवड मान्य असलेल्या सभासदांनी हात वर करून अनुमती द्यावी व आपले मत नोंदवावे. त्यावर सभेस उपस्थित एकूण ५७ सभासदांपैकी ५३ सभासदांनी हात वर करून सोसायटीच्या कमिटीने केलेली प्रकल्प

व्यवस्थापन सल्लागार यांच्या निवडीस सहमती दर्शवून मान्यता दिली व ४ सभासदांनी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्या निवडीस विरोध दर्शविला. त्यानंतर ५३ विरुद्ध ४ अशा बहुमताने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे.दिलीप संघवी कन्सल्टंट यांची निवड मान्य करून कायम करण्याचे ठरविले.

त्यानंतर सोसायटीचे सभासद श्री. चिंतामण गोडसे व श्री. भाऊसाहेब ठाणगे यांनी देखील आपले मत मांडले व विनंती केली कि, सर्व सभासदांना विश्वासात घेऊन कमिटीने काम करावे.

त्यानंतर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार श्री. सागर संघवी साहेब यांनी प्रथम स्वतःचा आणि पुनर्विकास क्षेत्रातील त्यांचा आतापर्यंतचा अनुभव यांचा थोडक्यात परिचय करून दिला. तसेच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे पुनर्विकास करताना काय काम असते, त्यांची पुनर्विकास प्रक्रियेमध्ये काय भूमिका असते याबाबत सर्व सभासदांना सविस्तरपणे माहिती दिली तसेच श्री.सूर्यकांत वायदंडे यांनी केलेल्या दाव्याबाबत त्यांनी सभासदांना योग्य ती उत्तरे देऊन सांगितले कि, माझ्याविरुद्ध न्यायालयात कोणतेही खटले प्रलंबित नाहीत.

त्यानंतर सोसायटीच्या सभासद श्रीमती. रचना म्हात्रे यांनी यावर आपले मत मांडले कि, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार श्री. सागर संघवी साहेबांनी सभासदांना अगदी सविस्तरपणे व योग्य ते मार्गदर्शन केलेले आहे. तसेच श्री. सूर्यकांत वायदंडे यांचे वक्तव्यावर आपले मत मांडले कि, पुनर्विकासाच्या कामास गैरसमज व माहितीच्या अभावामुळे खिळ घालण्याचे काम अथवा तसे प्रयत्न कोणीही करू नयेत तसेच एका तज्ञ व्यक्तीवर बिनबुडाचे आरोप करून सोसायटीच्या सभासदांची दिशाभूल देखील करू नये. तसेच प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे विरुद्ध केलेले आरोप देखील सिध्द करावेत. त्यावर श्री.सूर्यकांत वायदंडे यांनी स्वतः मान्य केले कि, सागर को-ऑप हौसिंग सोसायटी लि. संदर्भात असलेल्या कोर्ट केसमध्ये प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.दिलीप संघवी कन्सल्टंट पक्षकार नाहीत.

त्यानंतर सोसायटीचे सभासद श्री.संतोष माने यांनी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्ती करण्याकरिता आलेल्या निविदांबाबत माहिती विचारली असता, श्री. शशिकांत चौधरी यांनी सोसायटी कार्यालयास मिळालेल्या निविदांबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच याबाबत अधिकची माहिती सभासदांना हवी असल्यास सोसायटी कार्यालयात उपलब्ध आहे असे सभेपुढे सांगितले.

त्यानंतर सोसायटीचे अध्यक्ष श्री. महादेव सर्जेराव शिंगाडे यांनी सभासदांना पुन्हा एकदा प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची निवड कायम करण्याबाबत विचारणा केली असता, उपस्थित सर्व सभासदांनी एकमताने मे. दिलीप संघवी कन्सल्टंट यांची यांची निवड मान्य करून कायम करण्याचे ठरविण्यात आले.

**" ठराव करण्यात येतो कि, इमारतींच्या पुनर्विकास कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे. दिलीप संघवी कन्सल्टंट यांची निवड सर्वानुमते मान्य करून कायम करण्यात येत आहे ."**

**सूचक:-श्रीमती.रचना म्हात्रे-सदनिका क्र.डि-७/३/२-२ अनुमोदक:-श्री.दीपक कोरडे-सदनिका क्र.डि-८/३/०-३**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र.३) दि. २९/१०/२०२३ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेतील ठराव क्र. ०२ नुसार संचालक मंडळाने नियुक्त केलेल्या इमारतींच्या पुनर्विकास कामासाठी कायदेविषयक सल्लागार यांची निवड मान्य करून कायम करणे.**

**<u>ठराव क्र.३</u>** उपरोक्त विषय सोसायटीचे सभासद श्री. शशिकांत चौधरी यांनी सभेपुढे मांडला तसेच दि. २३ व २४ नोव्हेंबर २०२३ रोजी कायदेविषयक सल्लागार नेमणुकीकरिता लोकसत्ता, वाशी टाईम्स , डेली न्यूज बॅण्ड या वर्तमानपत्रात जाहिरात दिली होती त्यानुसार सोसायटी कार्यालयास ०३ निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यांच्याशी चर्चा करून वकील संतोष पळसकर व वकील स्वाती म्हात्रे यांची नेमणूक संचालक मंडळाने केलीली आहे असे सभेपुढे मांडले.त्यानंतर कायदेविषयक सल्लागार वकील संतोष पळसकर सोसायटीच्या सभासदांना स्वतःचा आणि त्यांच्या क्षेत्रातील कामाबाबतच्या अनुभव यांचा थोडक्यात परिचय करून दिला. त्यानंतर श्री.सुनिल खाडे यांनी सदर कायदेविषयक सल्लागार यांचे बाबत माहिती दिली व सभासदांना काही शंका / प्रश्न असतील तर ते विचारावेत अथवा सदर विषयास मंजुरी द्यावी असे सभेपुढे सांगितले.त्यावर सभासदांनी काही शंका /प्रश्न विचारले त्यास कायदेविषयक सल्लागार यांनी योग्य ती उत्तरे देऊन सभासदांच्या शंकाचे / प्रश्नांचे निरसन केले. व त्यानंतर सोसायटीच्या संचालक मंडळाने केलेली कायदेविषयक सल्लागार यांची निवड मान्य करून कायम करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

**" ठराव करण्यात येतो कि, इमारतींच्या पुनर्विकास कामासाठी कायदेविषयक सल्लागार म्हणून वकील संतोष पळसकर व वकील स्वाती म्हात्रे यांची निवड मान्य करून सर्वानुमते कायम करण्यात येत आहे. "**

**सूचक:-श्री. संजय आढांगळे-सदनिका क्र.-डि-३/३/१-१ अनुमोदक:-श्री.संपत झेंडे-सदनिका क्र.-डि-५/३/१-२**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र.४)सोसायटी इमारतींच्या पुनर्विकाससंबंधीच्या प्रकल्प व्यवहार्यता अहवालाची (PROJECT FEASIBILITY REPORT) माहिती सादर करणे त्यावर विचारविनिमय करून त्यास मंजुरी देणे.**

<u>ठराव क्र.४</u> उपरोक्त विषय श्री. शशिकांत चौधरी यांनी सभेपुढे मांडला व श्री.सुनिल खाडे यांना सदर विषयावर सविस्तर माहिती देण्याची विनंती केली. त्यावर श्री.सुनिल खाडे यांनी प्रकल्प व्यवहार्यता अहवालातील मुद्द्यांची सविस्तर माहिती / प्रेझेन्टेशन सभासदांपुढे मांडले. त्यानंतर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार श्री.सागर संघवी साहेब यांना प्रकल्प व्यवहार्यता अहवालाची माहिती सभासदांना देण्याची विनंती केली. त्यावर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार श्री.सागर संघवी साहेबांनी प्रकल्प व्यवहार्यता अहवालाची सविस्तर माहिती /प्रेझेंटेशन सभासदांपुढे मांडले. त्यानंतर सभासदांनी प्रकल्प व्यवहार्यता अहवालातील मुद्यांवर काही प्रश्न /शंका विचारल्या त्यास प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी सभासदांस योग्य ती माहिती देऊन सभासदांच्या प्रश्नांचे /शंकांचे निरसन केले. त्यानंतर सदर विषयावर विचारविनिमय केल्यानंतर सोसायटीचे सभासद श्री. शशिकांत चौधरी यांनी प्रकल्प व्यवहार्यता अहवाल मंजूर करण्याकरिता हात वर करून आपली मंजुरी द्यावी असे सभासदांना आवाहन केले त्यानंतर विशेष सर्वसाधारण सभेस उपस्थित सर्व सभासदांनी हात वर करून सर्वानुमते प्रकल्प व्यवहार्यता अहवालास मंजुरी देण्यात आली.

**" ठराव करण्यात येतो कि, सोसायटीच्या इमारतींच्या पुनर्विकाससंबंधीच्या प्रकल्प व्यवहार्यता अहवालावर सविस्तर माहिती घेऊन व त्यावर विचारविनिमय करून सदर प्रकल्प व्यवहार्यता अहवाल सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे."**

**सूचक:-श्री.दिपक कोरडे -सदनिका क्र.- डि-८/३/०-३ अनुमोदक:-श्री.निलेश मगर-सदनिका क्र.-डि-७/३/१-१ व श्री.चिंतामण गोडसे-सदनिका क्र.-डि-२/३/०-३**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र.५) सोसायटीच्या इमारतीच्या पुनर्विकासाच्या प्रकल्प निविदाची(TENDER DOCCUMENT) माहिती सादर करून त्यास मंजुरी देणे.**

<u>ठराव क्र.५</u> उपरोक्त विषय श्री. शशिकांत चौधरी यांनी सभेपुढे मांडला. व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना प्रकल्प निविदा मसुदा (TENDER DOCCUMENT) बद्दल माहिती देण्याची विनंती केली. त्यावर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी प्रकल्प निविदा मसुदा (TENDER DOCCUMENT) बद्दल सविस्तर माहिती/प्रेझेंटेशन सभासदांपुढे सादर केले. त्यानंतर सभासदांच्या काही शंका /प्रश्न असल्यास विचारावेत असे सांगितले त्यावर सभासदांनी आपल्या शंका/प्रश्न प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्यापुढे मांडले त्यावर त्यांनी सविस्तरपणे योग्य ती माहिती देऊन सभासदांच्या शंकांचे /प्रश्नांचे निरसन केले. त्यानंतर सभासदांनी प्रकल्प निविदा मसुदा (TENDER DOCCUMENT) करीत काही सूचना देखील मांडल्या.त्यानंतर सदर विषयावर

चर्चा झाल्यानंतर प्रकल्प निविदा मसुदा (TENDER DOCCUMENT) मधील माहिती व सभासदांच्या सूचना एकत्रित करून नव्याने तयार झालेल्या प्रकल्प निविदा मसुदा (TENDER DOCCUMENT) ला सर्वानुमते मंजुरी देण्याचे ठरविण्यात आले.

**" ठराव करण्यात येतो कि, सोसायटीच्या इमारतीच्या प्रकल्प निविदा मसुदा (TENDER DOCCUMENT) ची माहिती व सभासदांनी मांडलेल्या सूचना एकत्रित करून नव्याने तयार झालेल्या प्रकल्प निविदा मसुदा (TENDER DOCCUMENT) ला सर्वानुमते मंजुरी देण्याचे ठरविण्यात येत आहे."**

**सूचक:-श्री.शिवराज पाटील सदनिका क्र.डि-४/३/१-२ अनुमोदक:-श्री.सुरेश मगर-सदनिका क्र.डि- ८/३/०-१**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र.६) सोसायटीच्या हयात नसलेल्या (मयत) सभासदांच्या वारसांना वार्षिक व विशेष सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित राहण्यास अनुमती देणे व त्यांना सभासद करून घेण्याबाबत चर्चा करून निर्णय घेणे.**

**<u>ठराव क्र.६</u>** उपरोक्त विषय सोसायटीचे सभासद श्री. शशिकांत चौधरी यांनी सभेपुढे मांडला. त्यानंतर सोसायटीचे कायदेविषयक सल्लागार यांना सदर विषयाबाबत माहिती देण्याची विनंती केली.त्यावर सोसायटीचे कायदेविषयक सल्लागार वकील संतोष पळसकर साहेबांनी सदर विषयावर सविस्तरपणे माहिती सभासदांना दिली. त्यानंतर श्री. शशिकांत चौधरी यांनी सांगितले कि, मयत सभासदांच्या वारसांकडून सदनिका हस्तांतरणाबाबतची प्रक्रिया पूर्ण करून, सिडको अंतिम हस्तांतरण आदेश (CIDCO FINAL TRANSFER ORDER) सोसायटी कार्यालयात जमा केल्यानंतरच मयत सभासदांच्या वारसांना सोसायटीचे सभासदत्व देण्यात येईल तसेच शेअर्स सर्टिफिकेटवर देखील नोंद केली जाईल.तसेच मयत सभासदांच्या वारसांना वार्षिक व विशेष सर्वसाधारण सभेस उपस्थित राहण्याकरिता व कार्यालयीन कामकाजाकरिता उपस्थित राहण्याकरिता कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून घेतलेली आहे. त्यामुळे सदर मयत सभासदांच्या वारसांना PROVISIONAL MEMBER करून घेण्यात यावे. तसेच सोसायटीच्या बहुतेक सभासदांनी त्यांची वारस नोंद सोसायटी कार्यालयाकडे दाखल केलेली नाही तरी सर्व सभासदांना विनंती करण्यात येते कि, सभासदांनी आपले वारस नोंद सोसायटी कार्यालयाकडे दाखल करून घ्यावी. तसेच वारस नोंद अर्ज(NOMINATION FORM) सोसायटी कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. सभासदांनी नॉमिनेशन फॉर्म फी रु. २५/- भरून सोसायटी कार्यालयातून घेऊन नॉमिनेशन फॉर्म भरून सोसायटी कार्यालयात जमा करावेत. त्यानंतर सोसायटीच्या सभासद श्रीमती. रचना म्हात्रे यांनी सभासदांना माहिती दिली कि,प्रोजेक्ट चालू झाल्यानंतर सिडकोकडून हस्तांतरण प्रक्रिया बंद केली जाते त्यामुळे मयत सभासदांच्या वारसांनी

न्यायालयातून वारसाहक्क प्रमाणपत्र घेऊन सदनिका हस्तांतरणाबाबतची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करून घ्यावी.तसेच वारस नोंद करणेबाबतही सभासदांना माहिती दिली. त्यानंतर सोसायटीच्या हयात नसलेल्या (मयत) सभासदांच्या वारसांना वार्षिक व विशेष सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित राहण्याची अनुमती देण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. तसेच मयत सभासदांच्या वारसांनी सदनिका हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण करून सोसायटी कार्यालयात सदनिका हस्तांतरणाबाबतची सर्व कागदपत्रे , सिडको अंतिम हस्तांतरण आदेश (CIDCO FINAL TRANSFER ORDER) जमा केल्यानंतरच सभासदत्व देण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

**"ठराव करण्यात येतो कि, सोसायटीच्या हयात नसलेल्या (मयत) सभासदांच्या वारसांना वार्षिक व विशेष सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित राहण्याची अनुमती देण्याचे सर्वानुमते ठरविण्यात येत आहे. तसेच मयत सभासदांच्या वारसांनी सदनिका हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण करून सोसायटी कार्यालयात सदनिका हस्तांतरणाबाबतची सर्व कागदपत्रे तसेच सिडको अंतिम हस्तांतरण आदेश (CIDCO FINAL TRANSFER ORDER) जमा केल्यानंतरच सभासदत्व देण्याचे सर्वानुमते ठरविण्यात येत आहे."**

**सूचक:-श्री.अनिल यादव-सदनिका क्र.-डि-५/३/१-१ अनुमोदक:श्री.सूर्यकांत वायदंडे-सदनिका क्र.-डि-८/३/०-१**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्र.७) सोसायटी सभासदांच्या अपूर्ण असणाऱ्या कागदपत्रांची तसेच सिडको व प्रथम सभासद यांच्या दस्त नोंदणीची माहिती सभेपुढे सादर करणे व त्यांच्या पूर्ततेबाबत माहिती देणे.**

**<u>ठराव क्र.७</u>** उपरोक्त विषय श्री. शशिकांत चौधरी यांनी सभेपुढे मांडला. सिडको व प्रथम सभासद यांची दस्त नोंदणी झालेली नाही असे बहुतांशी सभासद आपल्याकडे आहेत असे सभेपुढे सांगितले. त्यानंतर सोसायटीचे कायदेविषयक सल्लागार वकील संतोष पळसकर साहेबांना विनंती केली कि, सभासदांच्या अपूर्ण असणाऱ्या कागदपत्रांची तसेच त्यांच्या पूर्ततेबाबत सभासदांना माहिती दयावी. त्यावर सोसायटीचे कायदेविषयक सल्लागार यांनी सभासदांना आवश्यक कायदेशीर कागदपत्रांची माहिती दिली. त्यावर सभासदांनी अपूर्ण असणाऱ्या कागदपत्रांची माहिती विचारली असता, सोसायटीचे कायदेविषयक सल्लागार यांनी सभासदांना सांगितले कि, सोसायटीच्या सर्व सभासदांच्या कागदपत्रांची छाननी करण्यात आली असून सभासदांच्या अपूर्ण असणाऱ्या कागदपत्रांची सविस्तर यादी देखील तयार करण्यात आलेली आहे. तरी सभासदांनी अपूर्ण असणाऱ्या कागदपत्रांची माहिती सभासदांनी सोसायटी कार्यालयातून घ्यावी अशी विनंती देखील केली. त्यानंतर सभासदांनी उपस्थित केलेल्या शंका/ प्रश्नांचे योग्य ती उत्तरे देऊन निरसन केले. त्यानंतर सोसायटीचे सभासद श्री. शशिकांत चौधरी यांनी देखील

आवश्यक कागदपत्रांची माहिती सभासदांपुढे सादर केली. त्यानंतर सोसायटी सभासदांनी अपूर्ण असणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता लवकरात लवकर करावी असे सर्वानुमते ठरविण्यात आले.

**सूचक:-श्री.विनोद सुर्वे -सदनिका क्र.-डि -६/३/१-४ अनुमोदक:-श्री.संदीप डोंगरे-सदनिका क्र.-डि -१०/३/०-२**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

शेवटी सोसायटीचे अध्यक्ष श्री. महादेव शिंगाडे यांनी पुन्हा एकदा उपस्थित सभासदांना विचारले कि, आपण आज विशेष सर्वसाधारण सभेत घेण्यात आलेल्या विषयांवर चर्चा करून ठराव संमत करताना ज्या ४ सभासदांचा सदर ठरावास विरोध होता त्यांच्या सर्व शंकांचे निरसन झाले आहे काय ? त्यावर त्यांनी होय म्हणून होकार दिला व त्या ठरावास अनुमती दिली.

त्यानंतर इतर कोणत्याही सभासदांचे सूचना /प्रश्न नसल्यामुळे सभेचे अध्यक्ष श्री. महादेव सर्जेराव शिंगाडे यांनी सभासदांच्या सहकार्याबद्दल उपस्थित सर्व सभासदांचे आभार मानले व राष्ट्रगीत घेऊन सभा संपल्याचे जाहीर केले.

**॥ जय हिंद ॥ ॥ जय महाराष्ट्र ॥ ॥ जय सहकार ॥**

सुखशांती को.ऑ. हौसिंग सोसायटी लि.

अध्यक्ष सचिव खजिनदार

SUKHSHANTI CO-OP. HSG. SOC. LTD. Reg. No. 752/ITR/1998-98 NAVI MUMBAI